RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ९, अंक ४३] सोमवार, एप्रिल २४, २०२३/वैशाख ४, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ८८**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ एप्रिल २०२३.

**अधिसूचना**

**वैधमापन शास्त्र अधिनियम, २००९.**

क्रमांक वैमाशा-२०२२/प्र.क्र.४०/ ग्रासं-३.—वैधमापन शास्त्र अधिनियम, २००९ (२०१० चा क्र.१) च्या कलम ५३ च्या पोट-कलम (१) व (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या संबंधात महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून उक्त अधिनियमातील कलम ५३ च्या पोट-कलम (१) मधील तरतुदीनुसार केंद्रशासनाची पूर्वविचारविनिमय केल्यानंतर याद्वारे महाराष्ट्र वैधमापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव :-** या नियमांना "महाराष्ट्र वैधमापन शास्त्र (अंमलबजावणी) (पहिली सुधारणा), २०२३" असे म्हणण्यात येईल.

२. महाराष्ट्र वैधमापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ (यापुढे "मूळ नियम" असे संबोधण्यात येईल) च्या नियम ६ मधील,—

(ग) पोट-नियम -१ मधील, तिसरा परंतुक वगळण्यात येत आहे ;

(घ) पोट-नियम -७ वगळण्यात येत आहे.

३. मूळ नियमातील नियम ७ च्या पोट-नियम (१) मधील,—

(ग) खंड "ग" वगळण्यात येत आहे ;

(घ) खंड "च" वगळण्यात येत आहे.

४. मूळ नियमातील नियम ८ च्या पोट-नियम (१) मधील,—

(क) खंड "ग" वगळण्यात येत आहे ;

(ख) खंड "च" वगळण्यात येत आहे.

५. मूळ नियमातील नियम ९ च्या पोट-नियम (१) मधील,—

(क) खंड "ग" वगळण्यात येत आहे ;

(ख) खंड "च" वगळण्यात येत आहे.

६. मूळ नियमातील नियम १० चा पोट-नियम (४) वगळण्यात येत आहे.

७. मूळ नियमातील नियम १४ चा पोट-नियम (५) वगळण्यात येत आहे.

८. मूळ नियमातील नियम १५ च्या पोट-नियम (३) मधील दुसऱ्या परंतुकानंतर खालील परंतुक समाविष्ट करण्यात येत आहे :—

परंतु आणखी असे की, काम बंद किंवा निलंबन, पोर्टल किंवा सर्व्हरच्या कोणत्याही समस्येमुळे, नैसर्गिक आपत्ती किंवा अटळ परिस्थितीमुळे शिक्क्याची विधीग्राह्यता समाप्त होण्यापूर्वी वजन वा माप यांच्या फेरपडताळणीचे काम होऊ शकले नाही तर, अशा प्रमाणात व अशा क्षेत्रात नियंत्रक विशेष आदेशाद्वारे अतिरिक्त शुल्कामध्ये सवलत देण्याबाबत निर्देशित करतील.

९. मूळ नियमातील नियम १६ साठी खालील नियम समाविष्ठ करण्यात येत आहे :—

"१६ फी वसूल करणे व कोषागारात जमा करणे,—

(१) पडताळणीचे काम सुरू करण्यापूर्वी, वैधमापन शास्त्र अधिकारी, नियंत्रक यांनी मान्यता दिलेल्या नमुन्यात शुल्क स्वीकारतील व पावती देतील,"

(२) वैधमापन शास्त्र अधिकारी यांचेकडून या नियमांतर्गत स्वीकारण्यात येणारे इतर सर्व शुल्क हे नियंत्रक यांनी मान्यता दिलेल्या नमुन्यात स्वीकारतील व पावती देतील."

१०. मूळ नियमातील नियम २१ चा पोट-नियम (३) वगळण्यात येत आहे.

११. मूळ नियमातील नियम २२ साठी खालील नियम समाविष्ठ करण्यात येत आहे :—

" २२- पडताळणी प्रमाणपत्र प्रदर्शित करणे-ज्या व्यक्तीला पडताळणी प्रमाणपत्र देण्यात आले आहे ते वजन वा माप वापरात असलेल्या ठिकाणी भौतिक किंवा डीजीटल स्वरूपात ठेवावे".

१२. मूळ नियमांशी जोडलेली अनुसूची-६ वगळण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**चारुशीला तांबेकर,**
शासनाच्या सहसचिव.

**FOOD, CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 24th April, 2023.

*NOTIFICATION*

LEGAL METROLOGY ACT, 2009.

No. LM-2022/CR-40/ CP-3.—The following rules further to amend the Maharashtra Legal Metrology (Enforcement) Rules, 2011, which the Government of Maharashtra propose to make in exercise the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 53 of the Legal Metrology Act, 2009 ( 1 of 2010), and of all other powers enabling it in that behalf and after consultation with the Central Government as required by sub-section (*1*) of section 53 of the said Act, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Legal Metrology (Enforcement) (First Amendment) Rules, 2023.

2. In rule 6 of the Maharashtra Legal Metrology (Enforcement) Rules, 2011 (hereinafter referred to as " the principal Rules"),—

(*i*) in sub-rule (*1*), the third proviso shall be deleted;

(*ii*) sub-rule (*7*) shall be deleted.

3. In rule 7 of the principal Rules, in sub-rule (*1*),—

(*i*) clause (*c*) shall be deleted;

(*ii*) clause (*e*) shall be deleted.

4. In rule 8 of the principle Rules, in sub-rule (*1*),—

(*i*) clause (*c*) shall be deleted;

(*ii*) clause (*e*) shall be deleted.

5. In rule 9 of the Principle Rules, in sub-rule (*1*),—

(*i*) clause (*c*) shall be deleted;

(*ii*) clause (*e*) shall be deleted.

6. In rule 10 of the Principle Rules, sub-rule (*4*) shall be deleted;

7. In rule 14 of the Principle Rules, sub-rule (*5*) shall be deleted;

8. In rule 15 of the Principle Rules, sub-rule (*3*), after second proviso, the following proviso shall be added, namely :—

" Provided also that, if the re-verification of weight or measure work could not be undertaken before expiry of the validity of stamp due to closure or suspension of works, any server or portal issue, natural calamities or other unavoidable circumstance, the Controller may relax such additional fees to such extent in such areas as he may be special order directs."

9. For rule 16 of the principle Rules, the following rule shall be substituted namely :—

" 16 Collection of fees and deposit into Treasury :-

(1) Before commencing the work of the verification, the Legal Metrology Officer shall receive the fee and issue a receipt, in the form approved by the Controller.

(2) All other payments received by the Legal Metrology Officer under these rules shall receive the same and issue a receipt, in the form approved by the Controller."

10. In rule 21 of the principal Rules, sub-rule (*3*) shall be deleted.

11. For rule 22 of the principal Rules, the following rule shall be substituted, namely :—

" 22. Certificate of verification to be kept.— The person to whom the certificate of verification is issued shall be kept the same in physical or digital form, where such weight or measure are being used."

12. Schedule VI appended to the principle Rules shall be deleted ;

By order and in the name of the Governor of Maharashtra,

CHARUSHILA TAMBEKAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.